**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व**

**उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**

**मुंबई विभागीय मंडळ,**

**वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.**

M. S. Board Of Secondary And
Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board,
Vashi, Navi Mumbai-400 703.

क्र.मुंविमं / माध्य.परीक्षा / 8786
वाशी नवी मुंबई. ४०० ७०३.
दिनांक १६ / ०९ / २०२६.

96

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
ठाणे / रायगड / पालघर,
मुंबई पश्चिम / दक्षिण / उत्तर.

विषयः—फेब्रु—मार्च २०२७, इ.१०वी परीक्षेसाठी प्रविष्ठ होणा—या विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्याची कार्यवाही तातडीने करणेबाबत.

संदर्भः—१.क्र.रा.मं./परीक्षा—३/३५०६ दिनांक १८/०८/२०२६ रोजीचे पत्र.
२.रा.मं.कार्यालयाची V.C.दिनांक १५/०९/२०२६ व्दारे प्राप्त निर्देश.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय परिपत्रक व V.C.व्दारे प्राप्त निर्देशानुसार कळविण्यात येते की, फेब्रु—मार्च २०२७ इ.१०वी परीक्षेस प्रविष्ठ होणा—या विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा खालीलप्रमाणे..

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्याचे आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी विहित पध्दतीने शुल्क भरावयाच्या तारखा |
|---|---|---|
| नियमित शुल्क | बुधवार, दिनांक १९ / ०८ / २०२६<br>ते<br>शनिवार, दिनांक ३१ / १० / २०२६ | सेमवार, दिनांक ३१ / ०८ / २०२६<br>ते<br>शनिवार, दिनांक ३१ / १० / २०२६ |
| विलंब शुल्क | रविवार, दिनांक ०१ / ११ / २०२६<br>ते<br>रविवार, दिनांक १५ / ११ / २०२६ | रविवार, दिनांक ०१ / ११ / २०२६<br>ते<br>रविवार, दिनांक १५ / ११ / २०२६ |
| अतिविलंब शुल्क | सोमवार,दिनांक १६ / ११ / २०२६<br>ते<br>सोमवार,दिनांक ३० / ११ / २०२६ | (प्रति विद्यार्थी प्रति दिन रू.५० / —)<br>सोमवार,दिनांक १६ / ११ / २०२६<br>ते<br>सोमवार,दिनांक ३० / ११ / २०२६ |

माध्यमिक शाळांनी शुल्क पावती/विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करावयाच्या तारीख दिनांक ०७/१२/२०२६

**आवेदपत्र सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्यात येणार नाही.याची संबंधितानी नोंद घ्यावी.**

सर्व मंडळ मान्यता प्राप्त शाळांकडून संबंधित विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे आवश्यक तेवढया गतीने शाळांमार्फत भरली गेलेली नसून आजतागायत फक्त ५१६९३ इतकीच आवेदनपत्रे शाळांमार्फत ऑनलाईन भरण्यात आलेली आहेत असे दिसून येते. किंबहूना,प्रतिवर्षाच्या अनुभवाप्रमाणे मंडळाच्या सूचनाप्रमाणे ऑनलाईन आवेदनपत्रे शीघ्र गतीने भरली जात नाहीत.

परिणामी, ऐनवेळेस शाळा आवेदनपत्रे भरण्यास एकदम सुरूवात करत असल्याने काही तांत्रिक अडचणी निर्माण होतात व अशा वेळी गैरसोय होऊन शाळांकडून अनेक अडचणी मंडळास मौखिकरित्या, दूरध्वनी / भ्रमणध्वनीव्दारे निदर्शनास आणून दिल्या जातात. या प्रक्रियेचा दुसरा अत्यंत महत्वाचा भाग म्हणून ऑनलाईन भरल्या जाणा—या आवेदनपत्रासंदर्भातील सर्व महत्वाची माहिती

(Data) याचे संकलन करण्यात येवून त्यावर गोपनीय साहित्य पुरवठा करण्याची महत्वाची कालमर्यादीत कार्यवाही विसंबून असते.

तेव्हा, सर्व संबंधित मुख्याध्यापकांना .या पत्राव्दारे पुनश्चः कळविण्यात येते की, आपापल्या शाळेतील सर्व इ.१०वी फेब्रु—मार्च २०२७ परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे तातडीने भरण्याची कार्यवाही पूर्ण करावी. तसेच, संबंधित विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्काची रक्कमही मंडळाच्या आवश्यक खाती भरणा करावी व सदर प्रक्रियेस विलंब होऊन अडचणी निर्माण होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे—पवार)
विभागीय सचिव,
माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय शिक्षण मंडळ,
वाशी, नवी मुंबई.४००७०३